विभाग क्रमांक :

सरकारी मुल्यांकन रुपये : /-

ठरलेली किंमत रुपये : /-

स्टॅम्प रुपये : /-

नोंदणी फी रुपये : /-

साठेखत करारनामा

साठेखत करारनामा आज दिनांक माहे मे इसवी सन २०१६ रोज ------वार ते दिवशी नासिक मुक्कामी

श्री.)

उ.व. वर्षे, व्यवसाय: नोकरी)

रा.)

) लिहून घेणार

(PAN NO.))

यांसी

सुकृत डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा.)

श्री. मंगेश अशोक धाकराव,)

वय: ३६ वर्षे, धंदा : शेती व व्यापार,) **लिहून घेणार**

पॅन नं. एएचजीपीडी ५९८६एम)

रा. ९०३/२० गोदावरी बंगला, चेतना नगर.)

राणेनगर, नासिक-९.)

(मंजूर बिल्डीग प्लॅनप्रमाणे सदनिका क्रमांक ___) चा करारनामा लिहून ठेवतात की,

१) अ) मिळकतीचे वर्णन : तुकडी जिल्हा नासिक, पोट तुकडी तालुका नासिक पैकी नासिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे नासिक** येथील **इंदिरानगर भागातील**

Scanned by CamScanner

बिनशेती मिळकत यांसी **सर्व्हे नंबर ८९३/३/३/२/१** याचे मंजूर ले-आऊट मधील **प्लॉट नंबर १ यांसी क्षेत्र ५८०.९७ चौरस मीटर** यांसी चतु:सीमा येणेप्रमाणे

पूर्वेस : ३० मीटर डी.पी. रोड
दक्षिणेस : ९ मीटर कॉलनी रोड
पश्चिमेस : प्लॉट नं. २ व ९ मीटर कॉलनी रोड
उत्तरेस : स.नं. ८९३/३/३/२/१

येणेप्रमाणे चतु:सीमेतील मिळकत जल, तरु, काष्ठ पाषाण, निधीनिक्षेपासहीत व तदंगभूत वस्तूसह असलेली जाण्यायेण्याचे वहिवाटीचे हक्कांसह दरोबस्त अशी मिळकत.

ब) या कराराचा विषय असलेली मिळकत

वर कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉटवर बांधलेल्या अशोक-छाया अपार्टमेंट मधील बांधीव सदनिका/गाळा (सदर सदनिका/गाळा दर्शविणारा नकाशा या लेखासोबत जोडलेला आहे) यांसी मंजूर बिल्डींग प्लॅप्रमाणे सदनिका/गाळा नं. ___ यांसी क्षेत्र _____ चौ.फुट म्हणजेच ___ चौ.मी. चतु:सीमा येणेप्रमाणे:-

पुर्वेस :
पश्चिमेस :
दक्षिणेस :
उत्तरेस :

येणेप्रमाणे कलम १ मधील प्लॉटस् भूखंडामध्ये असलेल्या वागवहिवाटीचे, रस्त्याच्या व इतर इजमेंटच्या हक्कांसह व सामाईक सोयीसुविधा, ॲमिनीटज, तसेच वर नमुद केलेल्या प्लॉटमधील वर चतु:सीमेत वर्णन केलेल्या सदनिकेच्या क्षेत्राच्या हिस्सेराशीने असलेला अविभक्त हिस्सा (सदर सदनिकेचा उल्लेख येथुन पुढे सदरची मिळकत असा केला आहे) मिळकत दरोबस्त.

१) मालकी हक्क व इतर तपशिल:

वर कलम १ अ मध्ये वर्णन केलेली मिळकत नासिक महानगपालिका हद्दीत रहिवासी विभागात आहे. सदर मिळकत ही १) **श्री. अशोक रघुनाथ कदम,** २) **सौ.**

Scanned by CamScanner

छाया अशोक कदम यांचे खरेदी मालकीची असून आमचेकडे विकासनाचे हेतुने प्रत्यक्ष कब्जावहिवाटीत आहेत. सदर प्लॉटवर **अशोक-छाया अपार्टमेंट** ही इमारत बांधली असून ती आमचे मालकीची आहे. सदर इमारतीतील वर कलम १ ब मध्ये वर्णन केलेली सदनिका ही या कराराचा विषय आहे. सदर मिळकतीमधील सर्व प्रकारचे हक्क राईटस्, टायटल, इंटरेस्ट हे मालकी हक्काने आमचेच आहेत. (यापुढे यांचा एकत्रित उल्लेख "हक्क व अधिकार" असा केलेला आहे.) सदरची मिळकत व त्यातील आमचे हक्क व अधिकार कोणत्याही मार्गाने, विक्री, वर्ग, असाईन, हस्तांतरीत, तबदील व नामांतरीत करण्याचा अगर ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्टमध्ये नमुद केलेल्या इतर कोणत्याही स्वरुपात हस्तांतर करण्याचा आम्हास विनाशर्त अधिकार आहे. (यापुढे या अधिकारांचा उल्लेख "हस्तांतरण अगर हस्तांतरीत" असा केला आहे.)

२) **मिळकत हस्तांतरणाचा निर्णय:** जमीनीचा विकास करुन त्यावर बांधकाम करुन ती बांधकामे ओनरशिप पध्दतीने विक्री/हस्तांतरीत करण्याचा आमचा व्यवसाय आहे. वर नमुद केलेली मिळकत आम्ही याच उद्देशाने बांधलेली आहे. वर कलम १ ब यात वर्णन केलेल्या सदनिकेची विक्री आम्हास करावयाची आहे. याबाबत माहिती झाल्यानंतर तुम्ही सदरची मिळकत चारही बाजूस फिरुन प्रत्यक्षपणे पहाणी केली. तुम्ही सदरची मिळकत पसंत केली व सदरची मिळकत स्वत:चे रहाण्यासाठी खरेदी घेण्यामध्ये स्वारस्य दाखविले. उभयतांमध्ये व्यवहाराची बोलणी झाली व तुम्ही बाजारभावाने योग्य व वाजवी किंमत देऊ केल्याने आम्ही तुम्हास सदरची मिळकत हस्तांतरीत करण्याचे कबूल केले व तुम्हीही सदरची मिळकत संपादीत करण्याचे मान्य व कबूल केले. उभयतांमध्ये व्यवहाराच्या अटी व शर्ती ठरल्या व अशा रितीने उभयतांमध्ये ठरलेला व्यवहार हा पक्का करार (कन्क्लुडेड कॉन्ट्रॅक्ट) झालेला आहे. या करारात नमुद केलेल्या अटी व शर्ती उभयतांवर बंधनकारक असून

Scanned by CamScanner

तुम्हास सदरची मिळकत कायम स्वरुपी हस्तांतरीत करण्याचे आम्ही मान्य व कबूल केले आहे.

३) **बांधकाम व ॲमिनीटीज:** इमारतीचे इंजिनीअर श्री. सुरज वराडे हे असून त्याचें मार्गदर्शनाने जनरल स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशनप्रमाणे बांधकाम सुरु आहे. या लेखात नमुद केलेल्या कन्सीडरेशनपोटी तुम्ही आम्हास देणार असलेल्या सदनिकेमध्ये समाविष्ट असलेल्या ॲमीनीटीजचा तपशिल या लेखाच्या परिशिष्टात नमुद केलेला आहे.

४) **विकसन करार :** वर कलम १ अ मध्ये नमुद केलेल्या भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या अशोक-छाया अपार्टमेंट या इमारतीमध्ये _____ एकूण __ युनिट असतील.

५) **<u>किंमत (कन्सीडरेशन):</u>** सदर सदनिका मिळकतीची किंमत तुमचे व आमचे दरम्यान रक्कम रुपये _____/- (अक्षरी रुपये _____ मात्र) अशी उक्ती ठरली असून सर्व परिस्थितीचा विचार करता सदनिकेची एकूण क्षेत्रफळाची होणारी किंमत ही बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी आहे. उभयपक्षांमध्ये किंमतीबाबत तक्रार नाही. सदरच्या किंमतीपोटी तुम्ही आम्हास आजपावेतो _____/- (अक्षरी रुपये _____ मात्र) इतकी रक्कम दिलेली आहे. उर्वरित रक्कम तुम्ही आम्हास पुढे नमुद केल्याप्रमाणे हप्त्याने/इन्स्टॉलमेंटप्रमाणे देण्याचे कबूल केलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे :

रक्कम रुपये	तपशिल
_____/-	अक्षरी रुपये _____ मात्र दिनांक _____ रोजी दिले ते पावले
_____/-	अक्षरी रुपये _____ मात्र चा भरणा वित्तीय संस्थेकडून कर्ज मंजूर झाल्यानंतर द्यावयाचे ठरले आहे.

Scanned by CamScanner

६) **मुदत व कब्जा:** वर नमुद केल्याप्रमाणे मिळकतीचे किंमतीची संपूर्ण रक्कम ही ठरलेल्या स्टेजेसप्रमाणे मिळणे गरजेचे आहे. संपूर्ण रक्कम मिळाल्यावर वर कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या सदनिकेचा कब्जा आम्ही तुम्हास तारीख्र ---------- रोजी अगर तत्पूर्वी देऊ.

७) **इसेन्स ऑफ कॉन्ट्रक्ट:** सदनिकेच्या किंमतबाबत मुदत निश्चीत करुन उभयतांनी जे हप्ते ठरविलेले आहेत त्या हप्त्याची रक्कम तुम्ही आम्हास त्या त्या तारखांना देणे, तसेच सदनिकेचा संपूर्ण किंमतीचा भरणा आमचेकडे मुदतीत जमा करणे ही या कराराची महत्वाची शर्त आहे. कोणताही एक हप्ता एका वेळी थकल्यास तुम्हास आठ दिवसांची सूचना/नोटीस देण्यात येईल. विलंबाचे देय रकमेवर द.सा.द.शे १८ टक्के दराने व्याज आकारले जाईल. त्या सूचनेच्या/नोटीसीच्या मुदतीमध्ये तुम्ही सर्व बाकी असलेली रक्कम न दिल्यास हा करारनामा आपोआप रद्द होईल. त्या दिवसापावेतो तुम्ही आम्हास सदनिकेच्या किंमतीपोटी जी रक्कम दिलेली असेल ती रक्कम फारेफिट होईल असे तुमचे व आमचे दरम्यान स्पष्ट ठरलेले आहे.

८) **यु.एल.सी:** वर कलम १ ब मध्ये वर्णन केलेली मिळकत ही बांधीव मिळकत असल्याने सदर मिळकतीस यु.एल.सी. कायद्यान्वये कलम २६ च्या तरतुदी लागु नाहीत.

९) **विकसाबाबतचे व हस्तांतरणाबाबतचे हक्क :**

अ. नाशिक महानगरपालिकेकडून जावक क्रमांक एलएनडी/बीपी-५/७०/५७६१, दिनांक १६/१०/२०१८ च्या पत्रान्वये सदर मिळकतीवर बांधकाम करण्यास परवानगी व कमेन्समेंट सर्टिफिकेट मिळालेले आहे. मंजूर इमारत नकाशाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर कायदेशीर विकास नियंत्रण नियमांना आधारभूत असे बांधकाम सुरु आहे.

Scanned by CamScanner

ब. वर कलम १-अ यांत वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीचा ले-आऊट हा मंजूर करण्यात आलेला आहे. त्याबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील पत्र क्र नगररचना विभाग/अंतिम/७५/२८१२ तारीख ०४/०८/१९९२ अन्वये आदेश घेतलेला आहे.

क. सदर प्लॉट मिळकत ही मे. जिल्हाधिकारी साहेब नासिक यांचेकडील पत्र क्रमांक मह/कक्ष ३/बि.शे.प.क्र./१६७/१९९२, ता. ०७/०५/१९९२ अन्वये कायमची बिशेतीकडे वर्ग झालेली आहे.

येणप्रमाणे सदरची प्रिमायसेस बांधण्यात आलेली आहे.

१०) कर :- सदर सदनिकेचा कब्जा देईपावेतो घरपट्टी कर आकारणी झाल्यास ते कर भरण्याची जबाबदारी आमचेवर राहिल. तुम्हास कब्जा दिल्यानंतर सदरच्या सदनिकेवरील कर भरण्याची जबाबदारी तुमचेवर राहील. तसेच प्लॉटस्/भूखंडाची बिनशेती कर आकारणी हिस्सेराशीने भरण्याची जबाबदारी तुमचेवर राहील.

११) कागदपत्र:- आमचेकडे असलेले कागदपत्र जसे मंजूर बिल्डींग प्लॅन, कमेन्समेट सर्टिफिकेट, ७/१२ उतारा, नोंदी, बिनशेती परवानगी, विकसन करारनामा, जनरल मुखत्यारपत्र, टायटल सर्टिफिकेट इत्यादीबाबतचे आपण अवलोकन करुन तपासलेली आहेत.

१२) रेकॉर्ड ऑफ राईट :- वर कलम १ अ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटमध्ये सदर इमारतीचे नोंदविले जाणारे नियोजीत अपार्टमेंट/ सहकारी संस्था म्हणजेच अशोक-छाया अपार्टमेंट असे नांव ७/१२ सदरी दाखल करण्यात येईल.

१३) बांधकाम दर्जा:- ठरलेले स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशन्स व ॲमीनीटजप्रमाणे सदनिकेचे प्रत्यक्ष बांधकाम जागेवर झाले असल्याची खात्री तुम्ही करुन घेतलेली आहे.

Scanned by CamScanner

बांधकामाचे दर्जाबाबत जनरल स्टॅण्डर्ड स्पेसिफिकेशन्स व ॲमीनीटीजबाबत आपली कुठलीही तक्रार नाही व तुम्हास त्याबाबत वाद उपस्थित करता येणार नाही. तुम्हास ॲडीशनल ॲमीनीज व जादा कामाची मागणी करता येणार नाही.

१४) <u>खालील गोष्टी आम्ही जाहीर करतो व खात्रीने व भरवशाने लिहून देतो की</u>

अ) मालकी हक्क: सदर मिळकतीचे आम्ही एकमेव मालक आहोत. व आमचेशिवाय सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क अगर हितसंबंध नाही.

ब) कब्जा: सदर मिळकतीचा कब्जा आम्ही तुमच्या व्यतिरिक्त इतर कोणासही देणार नाही. तुम्हास कब्जा देण्यापूर्वी सदर मिळकतीमध्ये आम्ही भाडेकरु अगर लायसेन्सी घालणार नाही.

क. हस्तांतरण : सदरची मिळकत आम्ही यापूर्वी कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत केलेली नाही अगर तसा कोणताही लेखी अगर तोंडी असा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही.

क) कर्ज: सदरच्या सदनिकेवर आम्ही कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतलेले नाही व कोणाकडेही सदरची मिळकत गहाण, दान, तारण, अगर प्लेज केलेली नाही. सदर मिळकतीवर कोणाचाही चार्ज नाही, सदर मिळकतीवर गहाणाचा बोजा चढविण्योच हेतुने सदर मिळकतीचे टायटल डिडस आम्ही कोणाकडेही डिपॉझिट केलेले नाही अगर ठेवलेले नाही.

१५) तुमच्या जबाबदाऱ्या: सदर मिळकतीबाबतच्या तुमच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे आहेत.

अ) सदर मिळकतीचा उपयोग वापर तुम्ही रहाण्यासाठी सूज्ञ माणसाप्रमाणे स्वत:साठी करावयाचा आहे व स्वत:चे खर्चाने उत्तम स्थितीमध्ये ठेवावयाचा आहे. तसेच मिळकतीचा वापर मंजूर बिल्डींग प्लॅनमध्ये ज्या कारणासाठी

Scanned by CamScanner

नमुद केला आहे त्याच कारणासाठी वापर करावयाचा आहे. सदनिकेमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल परस्पर करावयाचे नाहीत. सदर सदनिकेचा वापर वाणिज्य कारणासाठी करण्यास प्रतिबंध आहे. महानगरपालिकेकडून लिहून देणार यांचेविरुध्द किंवा जमीन मालकाविरुध्द काही कारवाई होईल असे कोणतेही कृत्य अगर बदल सदनिकेमध्ये करावयाचे नाहीत.

ब) नुकसान : केंद्र शासन , राज्य शासन, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, अगर इतर संस्थांनी प्रतिबंधीत व जाहीर केलेले कोणत्याही प्रकारचे स्फोटक वस्तू अथवा जीवीतास हानीकारक धोका निर्माण होईल अशा चिजवस्तू सदर सदनिकेमध्ये साठवावयाच्या नाहीत. तसेच सदनिकेमध्ये खूप वजनदार/अवजड वस्तू अथवा चिज नेऊन जागेचे अथवा इमारतीचे नुकसान झाल्यास ते नुकसान भरुन देण्याची जबाबदारी तुमचेवर राहिल.

क. देखरेख : तुमच्या सदनिकेमधील केरकचरा इमारतीभोवती असलेल्या मोकळ्या जागेत टाकावयाचा नाही अथवा सामायिक जागेमध्ये कोणत्याही रितीने बाधा येईल अथवा उपद्रव होईल अशा रितीने कोणतेही वर्तन तुम्ही करावयाचे नाही.

ड. अतिक्रमण : सदर इमारतीसाठी सह सामाईक वापरासाठी असलेल्या जागा उदा. गच्ची, मार्जीनल स्पेस, मधील मोकळ्या जागेमध्ये तुम्हास कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करता येणार नाही. तसे केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा आम्हास व संस्थेस अधिकार राहील.

इ. सुखसुविधा : वरील मिळकतीसंबंधाने येणारे सर्व टॅक्सेस, वॉटर चार्जेस, विमा हप्ते व इतर खर्च हे तुमचे तुम्ही भरावयाचे/करावयाचे आहेत.

ई. संस्था नोंदणी: कलम १ अ यात वर्णन केलेल्या भूखंडावर बांधलेल्या इमारतीतील बांधीव सदनिका धारकांना एकत्रीत करुन महाराष्ट्र अपार्टमेंट

Scanned by CamScanner

रकमेचे फेडीस तुम्हास विक्री करावयाची कलम १ब यात वर्णन केलेली बांधीव मिळकत फक्त तारण देता येईल.

१७) **मेंटनेन्स** :- सदर इमारतीतील सामायिक सोयीसुविधासाठी लागणारा खर्च हा सामायिकरीत्या करावयाचा आहे. उदा. कॉमन गेट, कॉमन लाईट बील, बोअरींग, बाहेरील विजेचे दिवे इत्यादी पोटी प्रत्येक सभासदाला रुपये _____/- (अक्षरी रुपये _____ मात्र) इतकी रक्कम द्यावयाची आहे. एकूण _____ सभासदांकडून जमा झालेली रक्कम रुपये _____/- (अक्षरी रुपये _____ मात्र) बँकेमध्ये ठेवून बँकेच्या नियमाप्रमाणे मिळणाऱ्या व्याजातून दरमहा येणाऱ्या रुपये _____/- (अक्षरी रुपये _____ मात्र) व्याजातून वॉचमनचा पगार, कॉमन लाईट बील इ. द्यावयाचे आहे + बोअरिंग, मेंटेनन्स बिनशेतीकर इत्यादी भरावयाचे आहेत.

१८) **मर्जीनल स्पेस वापरावयाचे हक्क व पार्कींग** : _____मधील रहिवाशांना सामाईक वापरासाठी असलेल्या जागा उदा. गच्ची, मार्जीनल स्पेस, मधील मोकळ्या जागा वापरण्याचा सामाई हक्क व अधिकार राहील मात्र सदर जागांमध्ये तुम्हास कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करता येणार नाही. तसे केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा आम्हास व संस्थेस अधिकार राहील.

१९) **करारनामा रद्द करण्याबाबतची कार्यपध्दती** : या करारनाम्यात नमुद अटी व शर्तीचे भंगामुळे अगर कोणत्याही कारणाने सदरचा करारनामा रद्द करण्याचा अगर आम्हास अधिकार प्राप्त झाल्यास नैसर्गिक न्यायतत्वांचा अवलंब केल्यानंतर सदरचा करारनामा रद्द करण्याचा आम्हास अधिकार प्राप्त होईल. त्या कारणाबाबत तुम्हास पंधरा दिवसाच्या मुदतीची एक नोटीस देवून संधी देण्यात येईल. ती संधी तुम्ही उपलब्ध करुन न घेतल्यास सदरचा करारनामा एकतर्फी रद्द करण्याचा आम्हास अधिकार राहील.

Scanned by CamScanner

२०) **आर्बीट्रेशन (लवाद):** या करारनाम्यात अटी व शर्तींबाबत त्यातील अर्थाबाबत अगर त्यातील कोणत्याही विषयाबाबत तुमचे व आमचे दरम्यान कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास तो निर्णयार्थ ॲडव्होकेट श्री. _____ नासिक यांचेकडे सोपविण्यात येईल. आर्बीट्रेटर यांचा निर्णय अंतीम राहील व तो उभय पक्षांवर बंधनकारक राहील.

२१) **नियम :** सदरचा करार हा महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह सोसायटीज ॲक्ट १९६० व महाराष्ट्र ओनरशीप फ्लॅट ॲक्ट (रेग्युलेशन ऑफ कन्स्ट्रक्शन, सेल्स, मॅनेजमेंट, ट्रान्सफर, ॲक्ट) १९६३ चे धोरण व नियमांना आधारभूत मानून व आधीन राहून करण्यात आलेला आहे.

२२) **कायदेशीर करार :** उभय पक्षांच्या दरम्यान झालेला करार हा कायदेशीर असून तो दिवाणी न्यायालयामार्फत अंमलबजावणीस पात्र असा करार आहे. सदरचा करार कोणत्याही कारणाने व्यर्थ (व्हॉइड) अगर वर्जनीय (व्हाईडेबल), बेकायदेशीर, अंमलबजावणीस अयोग्य (अन-इनफोर्सीबल) अशा स्वरुपाचा करार नाही. हा करार करण्यासाठी उभय पक्षांनी दिलेली संमती ही मुक्तपणे दिलेली संमती आहे. या करारातील लिहून घेणार व लिहून देणार व त्यांचेमार्फत हक्क सांगणाऱ्या सर्व व्यक्ती या सुबुध्द (साउंड माइंड) अशा आहेत. सदरचा करार करतांना कोणत्याही प्रकारच्या धाक किंवा बलप्रयोग (कोअर्षन) अनुचित प्रभाव (अनडयु इन्फल्युएन्स) कपट किंवा फसवणुक (फ्रॉड) असत्य प्रतिपादन, (मिसरिप्रेझेंटेशन) यांचा प्रयोग करण्यात आलेला नाही अगर झालेला नाही. हा करार उभय पक्षांनी कायद्याविषयीची अगर वस्तुस्थितीबाबतची कोणतीही चूक झालेली नाही अगर त्यांचेकडून कोणतीही चूक झालेली नाही. या करारातील उभयपक्ष हे करारपात्र असून त्यांना हा करार करण्याचा अधिकार आहे. अशा रितीने या लेखात नमुद केलेला करार हा संपूर्णपणे कायदेशीर असा आहे.

Scanned by CamScanner

येणेप्रमाणे उभयतांनी सर्व अटींना व शर्तींना पात्र राहून सर्व जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्याची जाणीव ठेवून व सर्व जबाबदाऱ्या स्विकारुन सदरचा करारनामा स्वखुशीने, स्वसंतोषाने, दोन साक्षीदारांसमक्ष लिहून ठेवला आहे.

हा करारनामा.

नासिक

तारीख: / /२०१८

श्री. मंगेश अशोक धाकराव ----------

प्रोप्राटर मे. सुकृत डेव्हलपर्स लिहून देणार

श्री. ----------

लिहून घेणार

साक्षीदार :

१) ----------

२) ----------

Scanned by CamScanner